# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# पुणे वृत्तांत
# वेळ - संध्याकाळी 06.00 वा.

**दिनांक- 27.03.2026** **वार- शुक्रवार**

---

**पेट्रोल-डिझेल**

पश्चिम आशियातल्या युद्धाच्या पार्श्वभूमीवर ,इंधनाचे दर आटोक्यात राखण्याच्या दृष्टीनं केंद्र सरकारने पेट्रोल आणि डिझेलवरच्या उत्पादन शुल्कात प्रतिलीटर १० रुपये कपात केली आहे. त्यामुळे पेट्रोलवरचं प्रतिलीटर १३ रुपये उत्पादन शुल्क ३ रुपयांवर आलं आहे, तर डिझेलवरचं प्रतिलीटर १० रुपये उत्पादन शुल्क पूर्णपणे काढून टाकलं आहे. यामुळे पेट्रोल आणि डिझेलचे दर कमी होतील अशी अपेक्षा आहे.

दरम्यान, आखाती देशातल्या युद्धस्थितीमुळे इंधन टंचाई आणि लॉकडाऊन लागणार असल्याच्या अफवांचं मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी खंडन केलं आहे. खोटी माहिती फेसबुक, एक्स किंवा कुठल्याही सोशल मीडिया प्लॅटफॉर्मवर टाकल्यास किंवा फॉरवर्ड केल्यास फौजदारी कारवाईला सामोरे जावे लागेल, असा इशारा त्यांनी दिला आहे . देशात पेट्रोल, डिझेल तसेच घरगुती गॅसचा पुरेसा साठा उपलब्ध असल्याने नागरिकांनी अफवांवर विश्वास ठेवून अनावश्यक साठेबाजी किंवा पंपांवर गर्दी करू नये, असे आवाहनही त्यांनी यावेळी केले. व्यावसायिक गॅस सिलेंडरचा पुरवठा टप्प्याटप्प्याने वाढवून ५० टक्क्यांपर्यंत नेण्याचा निर्णयही घेण्यात आल्याचंही मुख्यमंत्र्यांनी सांगितलं.

तर ,इंधन पुरवठा साखळी व्यवस्थित कार्यरत असल्याचे पेट्रोल डीलर्स असोसिएशननं ही म्हटलं आहे.

**ऊस गाळप भूषण**

राज्यातला ऊस गाळप हंगाम अंतिम टप्प्यात आला असून, २१० पैकी १८३ साखर कारखाने बंद झाले आहेत. राज्यात आतापर्यंत ९८ लाख टन साखरेचे उत्पादन झाले असून, सर्वाधिक २३ लाख टन उत्पादन कोल्हापूर विभागात झाले आहे. पुणे विभागात २२ लाख आणि सोलापूर विभागात १८ लाख टन साखरेचे उत्पादन झाल्याची माहिती साखर आयुक्त कार्यालयाकडून देण्यात आली. राज्यातला गाळप हंगाम पुढील १५ दिवसांत संपण्याची शक्यता असल्याची माहितीही साखर आयुक्तालयानं दिली.

**पुणेविभाग मध्यरेल्वे**

उन्हाळी सुट्टीत मे आणि जून महिन्यात पर्यटकांची होणारी गर्दी आणि बाहेरगावी जाणाऱ्या प्रवाशांचा ओघ लक्षात घेऊन, मध्य रेल्वेनं पुणे विभागातून 306 विशेष फेऱ्यांचं नियोजन केले आहे. यामध्ये प्रामुख्याने दानापूर आणि गोरखपूरसह विदर्भात जाणाऱ्या प्रवाशांची सोय केल्याची माहिती पुणे विभाग मध्य रेल्वेचे विभागीय वाणिज्य व्यवस्थापक हेमंतकुमार बेहेरा यांनी दिली.

उद्घाटन पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्यावतीनं दापोडी मधल्या मंत्री निकेतन बस स्टॉप ते मार्केट यार्डपर्यंत सुरू करण्यात आलेल्या पीएमपीएमएल बससेवेचे उद्घाटन आज महापौर रवि लांडगे यांच्या हस्ते झालं. या नव्या मार्गामुळे वेळ आणि खर्चाचीही बचत होणार आहे.परिसरातल्या नागरिकांकडून या बससेवेची मागणी दीर्घकाळापासून करण्यात येत होती.

**प्रदर्शन**

कागदी आणि लाकडी विमानांच्या प्रतिकृती, तसंच प्राचीन काळापासून ते आजच्या आधुनिक जेटपर्यंतच्या विमानांचा इतिहास आणि त्यामागील शास्त्र समजून घेत विद्यार्थ्यांनी आज विमानशास्त्राची अद्भुत सफर अनुभवली.

शास्त्रवाहिनी आणि एरोनॉटिकल सोसायटी ऑफ इंडिया पुणे शाखेच्या वतीनं 'सायन्स ऑफ फ्लाइट' प्रदर्शनाचं आयोजन करण्यात आलं आहे. पाषाण मधल्या अरोमी लॉन्समध्ये हे प्रदर्शन उद्या सकाळी १० ते रात्री ८ या वेळेत सर्वांसाठी विनामूल्य खुले आहे.

**ग्रंथपाल**

डेव्हलपिंग लायब्ररी नेटवर्क अर्थात डेलनेट या नवी दिल्लीत कार्यरत असलेल्या संस्थेच्या संचालक मंडळाच्या निवडणुकीत पुण्यातल्या यशस्वी एज्युकेशन सोसायटीच्या आय आय एम एस चे ग्रंथपाल पवन शर्मा यांची सर्वाधिक मतांनी तिसऱ्यांदा निवड झाली आहे. संस्थांमधल्या ग्रंथालयांच्या कामकाजासंबंधात राष्ट्रीय स्तरावर काम करणाऱ्या डेलनेट सोबत भारतातल्या ८,३०० शैक्षणिक संस्था आणि परदेशातल्या २३ संस्था सदस्य म्हणून जोडलेल्या आहेत.

**पुरस्कार**

सामाजिक कार्यकर्ते लायन अनिल मंद्रूपकर यांना ४७ वर्षे देशातल्या सहा राज्यांमध्ये केलेल्या सामाजिक कार्याबद्दल राष्ट्रीय स्तरावरील 'अटल राष्ट्र सेवा पुरस्कार' नुकताच प्रदान करण्यात आला. नवी दिल्लीत माजी केंद्रीय मंत्री डॉ. मुरली मनोहर जोशी यांच्या हस्ते त्यांनी हा पुरस्कार स्वीकारला. विविध सामाजिक संस्था आणि स्वयंसेवी संघटनांच्या माध्यमातून त्यांनी सातत्याने काम केलं आहे.

**निधन**

आंबेडकरी चळवळीतले ज्येष्ठ नेते, मुळशी पंचायत समितीचे माजी सदस्य आणि संत तुकाराम साखर कारखान्याचे माजी संचालक ॲड. मधुकर बळवंत वाघमारे यांचे काल पुण्यात अल्पश: आजाराने निधन झाले. ते 89 वर्षांचे होते. त्यांनी भूमीहिनांच्या चळवळीतील सहभागाबरोबरच महाराष्ट्रातल्या गोरगरीब, कष्टकरी, दलित, श्रमिक, झोपडपट्टी वासियांसाठी भरीव काम केले.

**हवामान**

पुणे आणि परिसरात आज कमाल तापमान 38 तर किमान तापमान 21 पूर्णांक 3 दशांश अंश सेल्सियस नोंदवलं गेलं. उद्या दोन्ही तापमानात काहीशी घट होण्याचा अंदाज आहे.

**हा होता आजचा पुणे वृत्तांत. उद्या पुन्हा भेटू विविध भारती पुणे केंद्रावर, संध्याकाळी सहा वाजता, ताज्या पुणे वृत्तांतमध्ये, नमस्कार.**